# पर्यावरण अहवाल

## २०२२-२०२३

## बि. ए. भाग - २

**श्रीराम कला महिला महाविद्यालय**
**धामणगांव रेल्वे**

# वरुड बगाजी

**सादरकर्ती**

कु. ____________________

बि. ए. भाग व्दितीय
श्रीराम कला महिला महाविद्यालय
धामणगांव रेल्वे

**मार्गदर्शक**

प्रा. ए.पी.दोड
श्रीराम कला महिला महाविद्यालय
धामणगांव रेल्वे

Scanned by CamScanner

# ऋण निर्देश

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत बी.ए.भाग २ च्या अभ्यासक्रमात पर्यावरणशास्त्र या विषयाचा समावेश करण्यात आला आहे. आज पर्यावरणाच्या वेगाने होणाऱ्या अवनतीमुळे पर्यावरणीय आपत्तीची संख्या व तीव्रता वाढत चालली आहे. यावर नियंत्रण मिळवायचे असेल तर या समस्यांची जाणीव समाजातील सर्व घटकांना झाली पाहिजे. विशेषत: युवा वर्गाला झाली पाहिजे. कारण त्यांच्या पासुन परिवर्तनाची अपेक्षा असते. या उद्देशातुनच या विषयाचा अंतर्भाव विद्यापीठीय अभ्यासक्रमात आलेला आहे.

श्रीराम कला महिला महाविद्यालय बी.ए.भाग २ च्या पर्यावरण अभ्यास भेटीसाठी यवतमाळ जिल्हयातील बेंबळा नदीवर बेंबळा प्रकल्पाची निवड करण्यात आली. दि.१४-२-२०२३ रोजी बी.ए.भाग २ सर्व विद्यार्थ्यांनी बेंबळा प्रकल्पास भेट दिली या अभ्यास भेटीमध्ये पर्यावरणाचे जैव विविधतेचे निरीक्षण करण्यात आले.

या भेटीसाठी संस्थेचे अध्यक्ष मा.अरूणभाऊ अडसड, स्थानिक व्यवस्थापन समिती अध्यक्ष मा.अशोकभाऊ पनपालीया, संस्थेचे सचिव मा.घनश्यामजी मेश्राम यांचे आम्ही मनपुर्वक आभारी आहे. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.यु.राऊत प्रकल्प भेटीकरीता मार्गदर्शन केले त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. तसेच प्रा.दादाराव उईके, प्रा.ए.पी.दोड, प्रा.एन.एम.बिहाडे, प्रा.राजेश आडे यांनी अभ्यास भेटीसाठी आयोजन केले याकरीता आम्ही त्यांचे आभारी आहोत.


तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी नागोरावजी पंचबुध्दे यांचे आम्ही मनपुर्वक आभारी आहोत. या शिवाय वरूड बगाजी प्रकल्पातील पाटबंधारे कर्मचाऱ्यांनी आम्हाला पिण्याच्या पाण्याची व जेवणाच्या जागेची सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

बी.ए.भाग दोन च्या विद्यार्थीनी

Scanned by CamScanner

# प्रकल्पाचे स्थान

वरूड बगाजी सागर
ता.धामणगांव रेल्वे
जि.अमरावती






Scanned by CamScanner

# वरूड बगाजी

**प्रस्तावना**

वरूड बगाजी हा प्रकल्प वर्धा नदीवर धामणगांव रेल्वे तालुक्यात वरूड बगाजी या ठिकाणी आहे.

हा प्रकल्प वर्धा नदीवर २८० मी. उंचीवर वसलेला आहे. प्रकल्पाची अती उच्च जलपातळी २९५.०० मी. इतकी आहे.

## प्रकल्पाचे फायदे

१) **पिण्याच्या पाण्याची व्यवस्था**

वर्धा नदीवरील प्रकल्पामुळे धामणगांव रेल्वे शहर व अमरावती जिल्हयातील ग्रामीण वासीयांना पेय जलाची उपलब्धता झाली त्यामुळे ग्रामिण विभागातील पाणी टंचाई कमी झाली.

२) **जलसिंचन**

वरूड बगाजी प्रकल्पामुळे अमरावती जिल्हयातील चांदुर रेल्वे, धामणगांव रेल्वे या तालुक्यात कालव्याव्दारे पाणी पुरवठा होवून ५०००० हेक्टर जमीन जलसिंचीत झाली यामुळे शेतकऱ्यांना वर्षातुन दोन ते तीन पिके घेता येतात.

३) **मासेमारी**

या प्रकल्पामध्ये वर्षभर पाणी उपलब्ध असल्याने येथे शासनातर्फे व खाजगीरीत्या जलाशयात मत्स्य बिजे सोडून मासेमारी व्यवसाय करण्यात येतो यामुळे परिसरातील लोकांना रोजगार उपलब्ध झाला.

४) **विजनिर्मीती**

या प्रकल्पातील पाण्याच्या गुरूत्वाकर्षन बलाव्दारे विद्युत जनित्रे फिरवुन १००० कि.व्हॅट विजनिर्मीती केली जाते.

५) **पर्यटन**

हा प्रकल्प धामणगांव आर्वी या राज्य मार्गावर आहे. वाहतुक साधनाच्या व वाहतुक जाळयांच्या सुविधेमुळे येथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढत आहे. पर्यटकांमुळे येथील लोकांना थोडयाफार प्रमाणात रोजगार निर्मीती होत आहे.

६) **लोकांच्या उत्पादनात वाढ**

या प्रकल्पामुळे येथील शेतीत बारमाही सिंचन व्यवस्था झाल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले त्यांचे उत्पन्न वाढल्याने इतर व्यावसायिकांचेही उत्पन्न वाढले.



Scanned by CamScanner

# प्रकल्पाचे तोटे

१) **पुर्नवसनाचा प्रश्न**

प्रस्तुत प्रकल्प निर्मीतीसाठी २० गावांना विस्थापीत करण्यात आले यामुळे त्यांचे पुर्नवसन अजुनही पूर्णपणे झालेले नाही. या गावातील शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी प्रकल्पाखाली गेल्या मात्र त्यांना अजुनही शासनातर्फे जमीनीचे वाटप करण्यात आलेले नाही. बहुतांश लोकांना पुर्नवसीत गावात जागा व घर मिळाले नाही.

२) **क्षारयुक्त मृदा**

या प्रकल्पातील पाण्यावर सततचे सिंचन केल्याने तसेच कालव्यातील पाणी जमीनीत झिरपल्याने सततच्या ओलाव्याने जमिनीतील खालचे क्षार वर येवून क्षारयुक्त मृदा तयार होत आहे त्यामुळे त्या जमिनीची उत्पादकता तयार होवून त्या नापिक बनत आहे.

३) **प्रकल्पग्रस्तावर अन्याय**

ज्यांनी धरणासाठी जमिन व घरे दिली त्यांना त्या मोबदल्यात तेवढी जमीन व घरे मिळाली नाही त्यांच्या संपत्तीचे योग्य मुल्यमापन झालेले नाही. असे पुर्नवसीत गावात शाळा, महाविद्यालय, दवाखाना, पोस्ट ऑफीस, क्रिडांगण, वाचनालय इ. सोयी सुविधांचा अभाव आहे.

४) **प्रदुषणाचा प्रश्न**

या परिसरात वरूड बगाजी प्रकल्पामुळे लोकांची व वाहनांची वर्दळ वाढली त्यामुळे वायुप्रदुषण, जलप्रदुषण, ध्वनीप्रदुषण निर्माण होत आहे.

५) **गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न**

हा प्रकल्प निर्माण होण्याआधी येथील फार मोठा भाग कुरनाखाली होता त्यामुळे गुराढोरांसाठी मोठया प्रमाणात गवत, चारा, वैरान उपलब्ध होते. परंतु ती कुरने पाण्याखाली आल्याने गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.



Scanned by CamScanner

# निष्कर्ष

१) वरूड बगाजी प्रकल्पाला भेट देण्यासाठी मंगरूळ दस्तगीर फाटयावर उतरावे लागते. परंतु तेथे प्रकल्पापर्यंत जाण्यास कोणतेच वाहतुकीचे साधन सहजासहजी उपलब्ध होत नाही. महाराष्ट्र शासनातर्फे किंवा खाजगीकरणाच्या सहकार्यातुन पर्यटकांसाठी वाहतुक साधनांची परिपूर्ण व्यवस्था व्हावी.

२) वरूड बगाजी हा प्रकल्प १ कि.मी. चे अंतर असुन बहुतांश प्रवासी तेथुन पायी चालत जातात. परंतु या रस्त्याच्या दुतर्फा झाडे नसल्याने त्यांना ऊन, वारा, पाऊस याचा त्रास होतो म्हणुन या रस्त्याच्या दुतर्फा तसेच प्रकल्पाच्या ठिकाणी मोठया प्रमाणात वृक्षारोपन करायला हवे.

३) या ठिकाणी पिण्याकरीता सार्वजनिक नळ उपलब्ध नसल्याने पिण्याच्या पाण्याची गैरसोय म्हणुन पर्यटकाची वाढती लोकसंख्या पाहता तेथे पिण्याच्या पाण्याची मुबलक व्यवस्था करण्यात यावी.

४) या प्रकल्पातुन केल्या जाणाऱ्या सततच्या सिंचनामुळे व कालव्याच्या पाझरणाऱ्या पाण्यामुळे काही शेत जमिनी क्षारयुक्त बनुन नापिक होत आहे.

५) या प्रकल्पाच्या स्थापनेमुळे अनेक गावे धरणक्षेत्रात बुडाली त्याचे पूर्णपणे अजुनही पुर्नवसन झालेले नाही. याकडे शासनाने विशेष लक्ष द्यायला हवे. तसेच पुर्नवसीत गावात प्रकल्पग्रस्तांना मुलभुत सोयी सुविधा पुरविण्यात याव्या.

६) धरण परिसरात मोठया प्रमाणात वसाड व पडीत क्षेत्र आहे तेथे वृक्ष लागवड करावी.

७) या प्रकल्पाला भेटी देणाऱ्या अभ्यासकासाठी विश्रामगृह, निवासस्थान व इतर सोयी सुविधा पुरविण्यात याव्या.

८) या प्रकल्पावरील सुरक्षा व्यवस्था आणखी कडक करायला हवी. कारण समाजकंठक किंवा आतंकवादी अशा ठिकाणी घातपात करू शकतात.

९) येथे येणाऱ्या पर्यटकामुळे कमालीची अस्वच्छता निर्माण होत आहे म्हणुन हा परिसर येथुन स्थानिक व्यवस्थापनाव्दारे वेळोवेळी स्वच्छ करण्यात यावा.

१०) या ठिकाणी धामणगांव येथुन दररोज एस.टी.बससेवा सुरु करण्यात यावी.



Scanned by CamScanner